# १०. भिकारी.

दर महिन्याला मी गावाला जातो. ट्रेनचा 2½ तासांचा प्रवास. वेळ कसा चटकन् जातो. ट्रेनमध्ये फेरीवाले व भिकारी येतात. ह्यावेळेला मात्र आलेल्या वेगवेगळया भिका-यांनी माझ्या मनात विचारांचे काहूर उठविले.

मी जेव्हा विचार करायाला लागलो तेव्हा मलाच आश्र्चर्य वाटले की किती वेगवेगळया रूपात भिक मागितली जात होती.

एक भिकारी नव्हे गाणे गाणारा आला. अर्थात तो भिक मागत नव्हता तर त्याची कला पेश करत होता. आवाज बरा होता. गाऊन झाल्यावर त्याने त्याची डफली पुढे करून बिदागी मागितली. पैशासाठी तो त्याची कला प्रथम फुकट पेश करत होता. जो पैसे देणार नाही त्याच्याकडे अवाजवी याचना करत नव्हता. जे मिळेल त्यात समाधान पावत होता.

थोडया वेळाने एक म्हातारा आला. अंगात पांढराशुभ्र सदरा व लेंगा असा पोशाख होता. वय अदाजे ६५ वर्षे. अंगकाठी अगदी बारीक. उपासमार झालेले शरीर पण स्वच्छ. सर्वांच्या पाया पडत होता. नजरेत व्याकूळ भाव. तोंडाने काहीच बोलत नव्हता. पण व्याकुळ भाव व पसरलेली हाताची ओंजळ त्यामुळे जवळ जवळ प्रत्येक जण त्याला पैसे देत होता. मी पण ५रू. त्याला दिले. मला प्रश्न पडला की ह्याचे कपडे एवढे स्वच्छ कसे ? कदाचित मनाविरूद्ध ह्याला भिक मागावी लागत असेल. त्याची मुले त्याला विचारत नसतील. त्याला कदाचित घराबाहेरही काढले असेल. एका म्हाता-या माणसावर आलेली परिस्थिती बघून मन दुःखी झाले. समाजात आर्थिक विषमता किती वेगाने पसरत आहे नाही ?

थोडया वेळाने लहान मुलगा (खरेतर त्याचे शाळेत जायचे वय) हातात झाडू घेऊन आला व कचरा काढू लागला. प्रवासी आपआपल्या बॅगा सरकवून कचरा काढून घेत होती. पाय वर करून त्याला कचरा काढायला सहकार्य करीत होती. त्यांना आपल्या बाकाच्या आजूबाजूला स्वच्छता हवी होती. पण कचरातर त्यांनीच केला होता. शेंगदाण्याची टरफले, सांडलेले वेफर्स इत्यादी. त्या मुलाने केर काढल्यानंतर मदतीची मागणी केली. बरेच प्रवासी तर आपण ह्या गावचेच नाही असे दाखवित खिडकीतून बाहेर बघू लागले. ट्रेनमध्ये प्रवाशानी कचरा केला नसता तर तो मुलगा आलाच नसता. खरेतर तो प्रवाशांची व रेल्वेची सेवा करत होता. मनात मदतीची अपेक्षा होती. तो काम करत होता व मगच पैशाची मागणी करत होता. कोणी त्याला कामाला लावले तरी त्याची तयारी असू शकेल का ? असे माझ्या मनात आले. त्याला कचरा काढायची युक्ती कोणी सांगितली असेल ? त्याच्यावर ही वेळ का आली असेल ? त्याचा काय अपराध होता ?

जन्म त्याच्या हातात नव्हता पण जगणे त्याच्या हातात होते व तो नेमके हेच करत होता. जगण्याला एक दिशा देत होता. मोठा झाल्यानंतर त्याचे काय होईल. त्याच्या सशक्त हाताना करायला काम मिळेल का ? तर्क करणे खूप कठीण आहे.

परत थोडया वेळाने काही लहान मुले डब्यात घुसली. पण ह्या मुलांनी रामायणातील वेगवेगळी सोंगे घेतली होती. एकजण राम झाला होता. लहान मुलगी सीता झाली होती. कोणी लक्ष्मण , कोणी मारूती वगैरे. सर्वांनी चेह-याला रंगरंगोटी केली होती. खोटे दागदागिने घातले होते. पितांबर नेसले होते. अंगावर शेला घेतला होता. बापरे रूपया / २ रूपयांची भिक मागण्यासाठी त्यांनी प्रथम गुंतवणूक केली होती.मेकअप ठीक केला होता. त्यांच्या सावळया तोंडावर ते रंग शोभून दिसत नव्हते. पण चेह-यावर आत्मविश्र्वास दिसत होता. किती विरोधाभास. रामाची भूमिका वठवताना चेह-यावर आत्मविश्र्वास पण भिक मागण्यासाठी रामाची भूमिका. लोकांच्या भावनेला हात घालण्याची चलाखी. मिळालेल्या पैशातून त्यांच्या मेकप व पोशाखाचा खर्च वजा जाऊन त्यांना काय शिल्लक रहात असेल ?

आपण रोज बरेच भिकारी रस्त्यावर , देवळाच्या बाहेर बघतो.
मग मनात विचार आला कि आपण कोणीतरी व समोरचा भिकारी अशी वर्गवारी करता येईल का ?
काय मित्रांनो गैर वाटला माझा प्रश्र्न ? पण बघा विचार करून. आपण कधीच भिकारी नसतो ? काय म्हणालात ? कसे शक्य आहे ?

बघा अजून विचार करा. आपल्या शाळेच्या प्रवेशासाठी आपल्या वडिलांनी शाळेच्या व्यवस्थापनाकडे घातलेल्या खेपा. काय होता त्याचा अर्थ ? मदतीची याचना. देणगी कमी करावे म्हणून केलेली विनंती.
आठवा आपल्या नोकरीचा अर्ज. पूर्वी तर 'I beg to apply ' असे लिहायची पद्धत होती. हल्ली जरी असे लिहत नसले तरी नोकरीचा अर्ज करताना भावना तीच असते.
एखादा देश मदत मागतो तेव्हा तो भिकेचाच प्रकार असतो.
आपण देवाची भक्ती करतो. तो काय वेगळा प्रकार असतो ? याचनेचाच एक प्रकार. सर्व सुख, शांती, पैसा मला मिळू दे. असेल तर आहे तसे राहू दे वगैरे. मला कळत नाही की भाविक स्वतःपुरती प्रार्थना का करतो ?
विश्र्वप्रार्थना का करत नाही ? सर्वांचे भले होऊ दे असे का म्हणत नाही ? सर्वांबरोबर त्याचेपण भले अपेक्षितच असते.
मला कल्पना आहे कि वरील बंडखोर विचार ब-याच जणांच्या पचनी पडणार नाहीत. पण नाव बदलले तरी मूळ गाभा बदलणार आहे का ?

त्यामुळेच मदत , याचना , प्रार्थना , इच्छा ह्या व अशाच अनेक गोंडस शब्दांमधील मूळ भावना ओळखा व जेव्हा कधी भिकारी दिसेल तेव्हा विचार करा. मनात आले तर भिक द्या पण त्याची चेष्टा करू नका. त्याला काही मजा येत नसेल तोंड वेंगाडायला. पण परिस्थितीच्या रेटयापुढे माणूस हतबल होतो व मग भिक मागण्याशिवाय त्याच्यापुढे प्रर्याय उरत नाही. कारण इच्छा असून काम मिळत नाही , परिस्थितीमुळे शिकायला परवडत नाही, अंगात कला असेलच असे नाही. मग जगण्यासाठी एक धडपड सूरू होते. . . .